IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# विदर्भाचा प्राचीन इतिहास:- एक दृष्टिक्षेप

**कु. श्रुती दिलीप कुमार लाड**
संशोधक विद्यार्थी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना**

विदर्भ भारताचा एक ऐतिहासिक प्रदेश,आपल्या समृद्ध संस्कृती आणि राजकीय इतिहासासाठी प्रसिद्ध आहे. विदर्भ हा प्रदेश गोंड या राजवटाखाली होता.नागपूर ही गोंडवाना राज्य संघातील गोंड घराण्याची राजधानी होती.गोंडवाना राज्य हे पूर्ण मध्यपूर्व भारतात पसरलेले होते 1818 च्या तिसरे इंग्रज गोंड युद्ध पराभवानंतर गोंड प्रभाव फक्त चंद्रपूर नागपूर विभागातच मर्यादित झाला नंतर गोंड राजांचे राज्य इंग्रजी साम्राज्यात विलीन करण्यात आले 1861. विदर्भ हा महाराष्ट्र राज्याच्या ईशान्य दिशेला असणारा प्रदेश असून विदर्भाचे दोन उपविभाग आहेत

१) नागपूर २) अमरावती

विदर्भात नागपूर अमरावती चंद्रपूर अकोला वर्धा बुलढाणा यवतमाळ भंडारा गोंदिया वाशिम गडचिरोली हे जिल्हे आहेत विदर्भाचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या 30.6%तर लोकसंख्या 21.3% आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाची आर्थिक उन्नती कमी आहे.

विदर्भाचा नकाशा व माहिती

प्रमाणवेळ. भाप्रसे (यूटीसी+५.३०)

क्षेत्रफळ. ९७,३२१ चौ. किमी

मोठे शहर. नागपूर

लोकसंख्या. २,०६,३०,९८७(2001)

घनता. २१२/किमी²

**भाषा मराठी**

**विदर्भातील जिल्हे दर्शक नकाशा**




विदर्भातील अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान आहे. या प्रदेशात कापूस, संत्रे,सोयाबीन ही उत्पन्न देणारी प्रमुख पिके आहेत .तसेच ज्वारी ,बाजरी, तांदूळही पिकविला जातो.

**इतिहास:- विदर्भ शब्दाची उत्पत्ती –**

विपुल प्रमाणात दर्भ उगवणारा प्रदेश तो विदर्भ ! अशी या नावाची उत्पत्ती आहे. विदर्भ शब्दाची फोड वि+तर्फ म्हणजेच मोठा महान प्रदेश.विदर्भ ही मराठी सातवाहन,राष्ट्रकूट,वाकाटक, यादव राजवटीतील वीर पुत्रांची भूमी आहे. महाराष्ट्रापासून काही बाबतीत सांस्कृतिक वेगळेपणा विदर्भात आहे.विदर्भाचे संदर्भ महाभारतात आढळतात.महाभारतातील कथेप्रमाणे विदर्भ हा आर्यवर्तातला देश होता.(मृत्युंजय कादंबरीचा लेख शिवाजी सावंत) ज्याची राजधानी अमरावती जवळील कुंडीतपूर सध्याचे कौंडण्यपूर येथे होती.वैदिक काळानंतर महाजन पदात विदर्भाचा समावेश होता.

१) अगस्त व लोपमुद्राचा विवाह

२) महाभारतातील रुक्मिणी हरण (विदर्भाची राजकन्या रुक्मिणीचा उल्लेख)

३) भूकंप, त्सुनामी, चक्रीवादळ इत्यादी आजही विदर्भात घडत नाही, याचे कारण सांगताना महाभारतातील उल्लेखानुसार विचार करावा लागतो. त्यामध्ये सांगितल्याप्रमाणे एकदा भगवान श्रीकृष्णाने रुक्मिणी मातेला वरदान मागण्यास सांगितले, त्यानुसार माझ्या राज्यांवर कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती येऊ नये असा वर रुक्मिणीने मागितला.

४) कालिदासाच्या मेघदुतात विदर्भाचा यक्ष -गंधर्वाची वनवासाची जागा अशी नोंद आहे.

५) महाभारतातील पांडवांचा अज्ञातवास विदर्भात व्यतीत झाला.’कीचक-वध‘अमरावती जवळील चिखलदरा येथे झाला.असा उल्लेख आढळतो.

६) महर्षी ‘गृत्समद’ यांना विदर्भातच कापसाचा शोध लागला. आणि त्यांनीच कापसाच्या धाग्यापासून कापड तयार करण्याची पद्धत विकसित केली.

७) प्रसिद्ध नल-दमयंतीची कथाही विदर्भ राज्याशी निगडित आहे.

तसेच ‘गृत्समद ‘ऋषींनी,विदर्भात कापसाची लागवड करण्याचा यशस्वी प्रयोग प्रथम त्यांनी कापसाचे सूत काढून त्याचे कापड मिळण्याचा ,शोध लावला.त्यांची ख्याती गणित,तत्त्ववेत्ता विणकर व कृषी संशोधक अशी होती. बौद्ध आणि जैन धर्माचा प्रसारही विदर्भात खोलवर झिरपला होता.त्याच्या खुणा उत्खननावेळी सापडतात.

सातवाहनांचे राज्य विदर्भावर दीर्घकालीन इसवी सन पूर्व 200 पासून सण 250 पर्यंत म्हणजे साडेचारशे वर्ष चालले.सातवाहन वंशातील सातकर्णी राजाच्या ताब्यात वैनगंगा पर्यंतचा प्रदेश सातवाहन राज्यात व्यापार होता.'गाथा सप्तशती' हा ग्रंथ त्याच काळातला!' गुणाख्याची बृहत्कथा' **ही देखील त्या काळातील.**वाकाटक वंशाने प्रदीर्घकाळ म्हणजेच सुमारे 300 वर्ष विदर्भावर राज्य केले. ते गुप्तांचे समकालीन समजले जातात.'वत्सगुल्म'(वाशिम) ही वाकाटकांची राजधानी. मराठी भाषेला भूषणावह ठरलेल्या महानुभावांच्या परंपरेतील' गोविंद प्रभू' हे विदर्भाचेच !त्यांची अमरावती जिल्ह्यातील 'रिद्धपूर 'ही कर्मभूमी! ती महानुभावांची 'काशी' समजली जाते.तेच महानुभावपंथाचे उगम स्थान. खुद्द श्री चक्रधर स्वामींचे वास्तव्य विदर्भात रामटेक, मेहकर, लोणार ,रिद्धपूर, सालबर्डी व अमरावती यासारख्या ठिकाणी होते. शुक्राचार्य, दमन, वृद्ध जमदग्नी, मार्कंडेय या ऋषींची स्थळे विदर्भात पयोष्णी, अर्थात पूर्णा नदीकाठची वरदा, वशिष्ठा, विदर्भ म्हणजे वर्धा, वेणा अर्थात वैनगंगा आणि प्रणिता अर्थात पैनगंगा या विदर्भातील नद्यांचे उल्लेख महाभारता सापडतात.

उल्कापातामुळे तयार झालेले जागतिक ख्यातीचे लोणार सरोवर विदर्भातलेच.अमरावती हे मुळातले अमरावती 'उमरावती' यादवच्या पैठण आणि अमरावती उमरावती या दोन राजघराण्यांपैकी एक! गणेश पुराणातील 'कळंब 'हे यवतमाळ जिल्ह्यातले.

जैनांचे पवित्र स्थान 'मुक्तागिरी' हे एलीचपूरच्या जवळ आहे.तसेच 'शिरपूर' हे स्थानही विदर्भात आहे .शिवाजी महाराजांचा तीन दिवस मुक्काम लाभलेले, व त्यावेळी त्यांनी कस्तुरी उंट विकत घेऊन ते कस्तुरीच्या मातीत टाकण्याची कथा सांगितली जाते ,ती माती विदर्भाच्या 'कारंजाची'! मुळात ते दत्ताचे ठाणे !सिंदखेडराजा, हे तर जिजामातेचे माहेरघर !

अलाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या स्वारी हून परतताना एलिचपूर हा ताबा घेऊन आपला अधिकारी तेथे नेमला होता.पुढे तो रामचंद्र देवाकडे गेला,त्याला खंडणी मात्र खिलजीकडे पाठवावी लागत होती. खिलजीचा विदर्भावर अंमल 1318पासून सुरू झाला. एलीचपूर हे मुसलमान शासनाचे महत्त्वाचे केंद्र बनले, ते इंग्रजी राजवटीपर्यंत.
भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण पुनर्निर्माण योजनेच्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी विदर्भाचा दौरा केला, व या क्षेत्रासाठी पुनर्वसन मदतीची घोषणा केली

**नैसर्गिक साधने**

विदर्भ हा वनस्पतीने आणि खनिज संपत्तीने संपन्न प्रदेश आहे. येथील गर्द हिरव्या वनराई मध्ये अनेक प्रकारची वनस्पती आणि अनेक वन्य पशुपक्षी नैसर्गिकपणे आढळतात. विदर्भातील सर्व व्याघ्र प्रकल्प महाराष्ट्रातील सर्व व्याघ्र प्रकल्प विदर्भातच आहेत.अमरावती जिल्ह्यात मेळघाट प्रकल्प, चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प,नागपूर जिल्ह्यात पेच व्याघ्र प्रकल्प हे विदर्भातील व्याघ्र प्रकल्प आहेत. विदर्भाच्या पूर्व भागात दाट जंगले, तसेच कोळसा आणि मॅग्नेटच्या खाणी आहेत. महाराष्ट्रातील सर्वात जुने राष्ट्रीय अभयारण्य 1955 मध्ये घोषित झालेले, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, विदर्भाच्या पूर्व भागात आहे.हा प्रकल्प भारताच्या 25 व्याघ्र प्रकल्पापैकी एक आहे. हा प्रकल्प 623 चौरस किलोमीटर एवढा असून, यात ताडोबा आणि अंधारी हे दोन चौकोनी प्रदेश आहेत.येथील ताडोबा तलावात महाराष्ट्रात एकेकाळी सामान्यपणे आढळणाऱ्या मगरींचे प्रजनन केंद्र होते .

**लोकसंख्या**

| जिल्हा | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| अकोला जिल्हा | ९,३६,२२६ | ८,८२,३९१ | १८,१८,६१७ |
| अमरावती जिल्हा | १४,८२,८४५ | १४,०४,९८१ | २८,८७,८२६ |
| भंडारा जिल्हा | ६,०४,३७१ | ५,९४,४३९ | ११,९८,८१० |
| बुलढाणा जिल्हा | १३,४२,१५२ | १२,४५,८८७ | २५,८८,०३९ |
| चंद्रपूर जिल्हा | ११,२०,३१६ | १०,७३,९४६ | २१,९४,२६२ |
| गडचिरोली जिल्हा | ५,४२,८१३ | ५,२८,९८२ | १,०७१,७९५ |
| गोंदिया जिल्हा | ६,६२,५२४ | ६,५९,८०७ | १३,२२,३३१ |
| नागपूर जिल्हा | २,३८८,५५८ | २,२६४,६१३ | ४६,५३,१७१ |
| वर्धा जिल्हा | ६,६५,९२५ | ६,३०,२३२ | १२,९६,१५७ |
| वाशिम जिल्हा | ६,२१,२२८ | ५,७५,४८६ | ११,९६,७१४ |
| यवतमाळ जिल्हा | १४,२५,५९३ | १३,४९,८६४ | २७,७५,४५७ |

2011 च्या जनगणनेनुसार विदर्भात 2,30,03,179 लोकसंख्या आहे.या प्रदेशाला हिंदू धर्म हा प्रमुख धर्म आहे.बौद्ध धर्म दुसऱ्या क्रमांकाचा धर्म आहे.तर इस्लाम धर्म तिसऱ्या क्रमांकाचा आहे.

**धर्म लोकसंख्या**

| धर्म | लोकसंख्या | प्रमाण (%) |
|---|---|---|
| हिंदू | १,५८,६६,५१४ | ७६.९०६% |
| बौद्ध | २६,९७,५४४ | १३.०७५% |
| मुस्लिम | १७,२०,६९० | ८.३४०% |
| ख्रिस्ती | ७०,६६३ | ०.३४३% |
| शीख | ३७,२४१ | ०.१८१% |
| जैन | ८९,६४९ | ०.४३५% |
| इतर धर्मीय | १२७,५१६ | ०.६१८% |
| निधर्मी | २१,१७० | ०.१०३% |
| एकूण | २,३०,०३,१७९ | १००.०००% |

**साहित्य संस्कृती**

विदर्भातील साहित्य क्षेत्रात विठ्ठल वाघ,यशवंत मनोहर ,बाबाराव मुसळे, श्रीपाद भालचंद्र जोशी ,सुधाकर गायधनी, कवी ग्रेस, सुरेश भट, अशोक पवार, सदानंद देशमुख, आशा बगे, वसंत आबाजी डहाके,नामदेव कांबळे,नारायण कुलकर्णी कवठेकर, एकनाथ पवार,राजा धर्माधिकारी,शेषराव धांडे, किरण शिवहरी डोंगर दिवे,

विलास अंभोरे, इत्यादी अनेक दिग्गज आणि युवा लेखक आणि कवी यांच्या नामावलीमुळे विदर्भातील साहित्य क्षेत्र समृद्ध होतयं.

**राजकीय इतिहास**

1) सातवाहन इसवी सन पूर्व 200 ते 250 या काळात सातवाहन वंशाचे राज्य विदर्भात होते.

2) कलचुरी राष्ट्रकूट यादव यानंतर कलचुरी राष्ट्रकूट आणि यादव घराण्यांनी विदर्भावर राज्य केले.

3) गोंड नंतर विदर्भ गोंड राजवटीखाली आला आणि नागपूरही गोंडवाना राज्य संघाची राजधानी बनली.

**निष्कर्ष**

विदर्भाचा इतिहास हा संघर्ष विकास आणि बदल यांचा एक अनोखा संगम आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत विदर्भाने अनेक चढ-उतार पाहिले आहे. आजही विदर्भ हा विकासाच्या मार्गावर आहे.

**संदर्भ**

1) मराठी विश्वकोश मराठी भाषा विभाग
2) package for farmers in 31 districts proposed achieved 2007
3) http://project tiger.nic /tadoba htm
4)http://project tiger.nic.in /map htm
5)Vidarbha population 2011
6) अंडर डेव्हलपमेंट इन विदर्भ संदीप फंडाळकर
7) लोकमत नागपूर ई-पेपर दिनांक 26.9.2013 पान क्रमांक 8.